## प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०६.०६.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | क्र.१) श्री.दयानंद राजसिंग डिक्का, वय ३४ वर्ष, पद–सफाई कामगार, नेमणूक – शासकीय माध्यमीक आश्रमशाळा टिटंबा, ता.धारणी सध्या नेमणूक – सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय,अमरावती रा.आई निवास, प्लॉट नं. ८बी,सावता मैदान,दत्तवाडी, जुनी वस्ती बडनेरा,अमरावती<br><br>क्र.२) सय्यद अन्सार सय्यद लतीफ, वय–३२ वर्ष धंदा– पानटपरी, रा. पोलीस चौकीच्या मागे,चपराशीपुरा,अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०६/०६/२०२३ चे १४/३४ ते १५/२० वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ८,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ८,०००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | मेहक कोल्ड्रीन्क्स पानठेला ,सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती च्या समोर, जुना बायपास,अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ०५/०६/२०२३ रोजी तक्रार दिली की, ते कोतवाल पदावर लागल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. त्यानंतर सदर जातवैधता प्रकरण तहसील कार्यालय अंजनगांव सुर्जी यांनी संपुर्ण कागदपत्रे पडताळणी करीता अनुसुचीत जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती कडे पाठविले होते. त्यानंतर तक्रारदार त्यांचे जातवैधता प्रमाणपत्राच्या पाठपूरावा करण्याकरीता अमरावती येथील कार्यालयात गेले असता त्या ठिकाणी तेथील कर्मचारी श्री.दयानंद डिक्का यांना भेटले व त्यांच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत विचारपुस केली असता कर्मचारी दयानंद डिक्का यांनी तक्रारदार यांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र मिळवुन देण्यासाठी १०,०००/–हजार रूपये पैशाची मागणी करत असल्याबाबत लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.०६/०६/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान अनुसुचीत जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती येथील कर्मचारी श्री.दयानंद डिक्का यांनी तक्रारदार यांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र मिळवुन देण्यासाठी तडजोडीअंती ८,०००/–हजार रूपये पैशाची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरुन दिनांक ०६/०६/२०२३ रोजी पंचासमक्ष आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान इतर आरोपी लोकसेवक श्री.दयानंद राजसिंग डिक्का, वय –३३ वर्ष, सफाई कामगार, सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडील लाचेची रक्कम ८,०००/– रु. मेहक कोल्ड्रीन्क्स पानठेलाचा चालक सय्यद अन्सार सय्यद लतीफ,रा.अमरावती याचे मार्फतीने पंचासमक्ष स्विकारली वरुन आज रोजी वर नमुद दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द पो.स्टे.फ्रेजरपुरा जि.अमरावती शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.शिवलाल भगत, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.केतन मांजरे, पो.नि.प्रविणकुमार पाटील, पो.कॉ.आशिष जांभोळे, पो.कॉ.वैभव जायले, पोहेकॉ प्रमोद रायपुरे, चा.पोउपनि.सतिश किटूकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी,अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५
मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर – १०६४.

उप-अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती

(केतन मांजरे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
मो.न.८८८८६०२९२०